






# ज्ञान प्रबोधिनी
# शैक्षणिक साधन केंद्र

## ई - प्रशिक्षक

वर्ष ३: अंक १ ऑक्टोबर २०१५




## कै. आप्पांच्या आठवणी, विचार आणि कार्य



## "शिक्षण व्हावे चैतन्यदायी"



## प्रज्ञावंतांचे शिक्षण: का? कसे? कुणी?

# संपादकीय

सस्नेह  नमस्कार

ज्ञान प्रबोधिनीने मांडलेल्या शिक्षण पद्धती मध्ये समाजात होणारे सहज शिक्षण आणि शाळा  – महाविद्यालयांत चालणारे औपचारिक शिक्षण या शिवाय संघटनेत होणाऱ्या शिक्षणाचाही अंतर्भाव केलेला आहे. संघटित समाज निर्माण होण्यामध्ये समाजातील विविध संघटनांचा महत्वाचा सहभाग राहिला आहे. पाश्चिमात्य समाजाचे संघटित रूप स्वामी विवेकानंदांनी पाहिले होते. व्यक्तिगत स्वार्थ आणि हितापेक्षा राष्ट्रीय स्वार्थ आणि हिताला प्राधान्य देणारे नागरिक तयार करायचे असतील तर सामूहिक आचार-विचारांना प्राधान्य देणारे शिक्षण द्यावे लागेल. संपूर्ण जगातच एके काळी धर्म संप्रदायांनी हे काम केल्याचे आढळते. युरोपीय समाजात चर्चद्वारे होणारे शिक्षण हे याचे उत्तम उदाहरण आहे. आजच्या आधुनिक काळात अनेक सामाजिक विषय पुढे येत आहेत. नैसर्गिक आणि सामाजिक पर्यावरण, सामाजिक ऐक्य आणि प्रादेशिक अखंडता, सर्वसमावेशक विकास, एखाद्या राष्ट्रातील घटनात्मक हक्क व कर्तव्ये यासारख्या विषयांना सामोरे जाताना आचार विचारांची सुयोग्य जुळणी करत जावे लागते. झुंडशाही पलिकडचा विचार करायचा असेल तर सामूहीक जीवनातील कर्तव्यांचे शिक्षण व्हावे लागते. जगभरातील अनेक राष्ट्रांमध्ये आधुनिक संघटना तयार झाल्या. इंग्लंडमधील स्काउट गाईड चळवळ, भारतातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेवादल यासारख्या संघटनांमधून विद्यार्थ्यांना संघटित जीवनाचा अनुभव घेता येण्याची व्यवस्था झाली. भारतासारख्या सव्वाशे कोटी लोकसंख्येच्या देशात अशा अनेक संघटनांची आवश्यकता आहे. ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक संचालक कै. वि.वि.तथा आप्पा पेंडसे यांनी जीवनाच्या अनेकानेक क्षेत्रांतील पंचवीस पेक्षा जास्त संघटनांची कल्पना केली होती. परंतु आजची स्थिती काय आहे? औपचारिक शिक्षण आणि त्याला जोडून असलेल्या शिकवणी वर्ग आणि क्लासेस यातून आजच्या युवापिढीला अशा संघटित जीवनाचा अनुभव घेणे अशक्य झाले आहे. त्यातून युवा पिढी बेशिस्त झुंडशाहीच्या दिशेने जाण्याची शक्यता वाढत चालली आहे.

सार्वजनिक उत्सवांमध्ये याचे प्रत्यंतर येत असते. आणीबाणीच्या परिस्थितीला  ( नैसर्गिक आपत्ती,युद्धे,इ. ) समाज कसा प्रतिसाद देतो हे सर्व सामान्य परिस्थितीत समाजातील संघटनेतील शिक्षण कसे चालते यावर अवलंबून असते. दुसऱ्या महायुद्धात आणि त्या नंतर युरोपातील सर्वच राष्ट्रांनी दाखवलेली सामाजिक शिस्त आणि व्यवहार हा त्या आधीच्या त्यांच्या संघटन शिक्षणाचा परिणाम आहे.

अतिरेकी रेजिमेंटेशनचा धोका टाळून असे शिक्षण कसे द्यायचे हा आजच्या भारतापुढचा प्रश्न आहे.

वाचकांनी आपल्या शालेय-महाविद्यालयीन काळात घेतलेले असे अनुभव जरूर लिहावेत.

विवेक पोंक्षे.
संपादक
‘ ई’ ‘प्र’शिक्षक



## भव्य, उत्कट, प्रांजळ

१९६३ साली पुणे विद्यापीठात मी एम्. ए. करीत होते. मानसशास्त्र विभागातील प्राध्यापकांमध्ये, वेगळ्या पोशाखातील उंच, रुबाबदारपणे चालणारी, कमरेवर हात ठेवून एका विशिष्ट शैलीत बोलणारी एक व्यक्ती लक्ष वेधून घेई. वाटायचं की हे व्यक्तिमत्त्व काही केवळ प्राध्यापकाचं नाही. या भव्य व्यक्तिमत्त्वाला ती छोटीशी लँब्रेटाही शोभत नाही.दुसरं काहीतरी वाहन हवं.

मग ही व्यक्ती म्हणजे डॉ. वि. वि.पेंडसे – आप्पासाहेब पेंडसे आहेत असे कळले. ते आम्हाला शैक्षणिक मानसशास्त्र शिकवीत. शिकवता – शिकवताच चिंतन करीत. दूरवरचा विचार करीत. भारतीय आणि पाश्चात्य शिक्षण विचाराची तुलना करीत.मला माझ्या अडचणींमुळे नेहमी तासांना उपस्थित राहता येत नसे. एक दिवस त्यांनी मला बोलावून घेतलं. मला जरा धास्तीच होती. ‘तासाला का येत नाही?’ अशी विचारणा होईल म्हणून. पण ते अगदी सौम्यपणे, प्रसन्नपणे बोलले. ‘तुम्ही पीएच्. डी. करा. तुम्हाला खात्रीने जमेल.’ असे धीराचे, प्रोत्साहनाचे शब्द ऐकायला मिळाले, मन उल्हसित झालं. हळूहळू त्यांना ‘आप्पा’ म्हणण्याइतका मोकळेपणा वाटू लागला.

माझा धाकटा भाऊ अनिल याच्यावर आप्पांचा खूप लोभ. माझ्या मुलांना-रजू-हेमंताला एकदा विद्यापीठात घेऊन यावं असं आप्पांनी मला सुचवलं. मुलं आली तेव्हा त्यांचं कौतुक केलं- ‘मोठ्ठे मोठ्ठे डोळे आहेत तुमच्या मुलांचे!’

## डाळ पाखडणारे आप्पा!

एक दिवस मी सकाळी आप्पांकडे गेले तर ते घरातल्या पोशाखात हातात सूप घेऊन तुरीची डाळ पाखडत असलेले दिसले ! मी गांगरून गेले. तो घरगुतीपणा आवडलाही. त्यांच्याकडे काम करणाऱ्या काकाजींनी केलेली गरम धिरडी खायची, कॉफी प्यायची हे नेहमीचंच आतिथ्य होतं.आप्पा म्हणतील ते प्रमाण ! असा त्यांचा आग्रह असे – असा काहींचा अनुभव होता. कदाचित काही बाबतीत ते खरंही असेल. पण मला मात्र वेगळा अनुभव आहे. मी प्रबोधिनीच्या मानसशास्त्र विभागात काम करत आहे तेव्हापासून संशोधनात, प्रशासनात, आर्थिक व्यवहारात इतरत्र कुठेही नसतं एवढं स्वातंत्र्य प्रबोधिनीत असल्याचा माझा अनुभव आहे.

चुकांबद्दल आप्पा रागावत. तिखट बोलत. त्याचं मला दु:ख होई. पण त्यांच्यावरचे अनंत प्रकारचे ताण, त्यांच्या आकांक्षा, त्यातून होणारी ओढाताण यामुळे त्यांची चिडचीड होत असे हे मला समजत होतं. मुळात हा माणूस अकृत्रिम, भावसंपन्न वृत्तीचा, अपरंपार जिव्हाळा, ओलावा पोटी असलेला, स्वत:बरोबर इतरांनाही दूरचं पाहायला लावणारा, मोठी झेप घेण्याचा आग्रह धरणारा, हातून झालेल्या चुकांविषयी प्रांजळपणे बोलणारा असा होता.त्यांच्या सहवासात काही शिकणं झालं. आता त्यांच्या स्मृतीतून अजून पुष्कळ समजावून घ्यायचं आहे, शिकायचं आहे.

वाच. उषाताई खिरे

प्रज्ञा मानस संशोधिका , पुणे

# “ शिक्षण व्हावे चैतन्यदायी ”

विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसन हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्यासाठी वाचन-लेखन हे साधन आहे. तेही एकमेव साधन नव्हे. दुर्दैवाने आजच्या शिक्षणात या साधनाला (आणि आता संगणकाला) अधिकच महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष हेतुपूर्ण कृती, त्यातून घेतलेले अनुभव, त्या अनुभवांवरचा विचार आणि ते अनुभव व्यक्तिमत्त्वात मुरत जाणे दुय्यम होत चालले आहे. अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या शर्यतीत व्यक्तिमत्त्व घडणीच्या प्रक्रियेला शालेय शिक्षणात स्थानच उरले नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षणात प्रत्येक विद्यार्थ्याला 'स्व'विकासाची संधी मिळणे महत्त्वाचे आहे.

काही वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एका शाळेत गेलो होतो. शाळा तशी सर्वसाधारणच होती. म्हणजे तालुक्याच्या ठिकाणी असते तशी! साधीच इमारत, छोटेसे मैदान, पत्र्याचे छप्पर, जागोजागी तुटलेले तारेचे कुंपण आणि मैदानाच्या मधून चाललेली गावकऱ्यांची ये-जा. वर्गात डोकावून पाहिले, तर नेहमीचेच दृश्य. पन्नास-साठ मुले दाटीवाटीने लाकडी बेंचवर - डेस्कवर बसलेली, पुढ्यात वह्या, फळ्यावर काही-बाही लिहिलेले आणि शिक्षक शिक्षिका हातात पुस्तक घेऊन समजावून सांगताहेत. व्हरांड्यातून जाता जाता एका वर्गाने माझे लक्ष वेधून घेतले. त्या वर्गात काहीतरी विलक्षण आणि वेगळे जाणवले. चार -चार पाच -पाच विद्यार्थी डेस्कवरच्या कागदावर ठेवलेले काहीतरी पाहताना दिसत होते. एकीच्या हातात बहिर्वक्र भिंग होते. ती भिंगातून तो पदार्थ पाहात होती. एकीकडे निरीक्षण चालले होते. कोणीतरी वहीत लिहिताना दिसत होते. जोरजोरात बोलणे चालले होते. हे बोलणे गप्पांपेक्षा वेगळे होते. बहुधा चर्चा चालल्या होत्या. प्रत्येक गटात एकतरी भिंगधारी विद्यार्थी दिसत होता. फळ्यावर रंगीत खडू वापरून काढलेली छान आकृती दिसत होती आणि एक तरुण शिक्षक वर्गात हिंडत हिंडत विद्यार्थ्यांशी संवाद साधत होता. सारा वर्ग एका चैतन्याने भारून गेला होता. मी खिडकीपाशी उभा राहून हे पाहतो आहे याकडेही कोणाचे लक्ष नव्हते. वर्गातल्या त्या चैतन्याचा मलाही स्पर्श होत होता. वर्गात जे चालले होते, ते शिक्षण होते. चार भिंतींच्या आत विद्यार्थी-शिक्षक यांनी एक चैतन्यदायी, समृद्धवातावरण तयार केले होते. त्या अर्ध्या-पाऊण तासात मला दर्जेदार शिक्षण -प्रक्रियेचे दर्शन झाले होते. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे तालुक्याच्या गावची ती एक सर्वसामान्य शाळा होती. लाखोवारी फी घेणारी, चकचकीत इमारती, समृद्ध प्रयोगशाळा आणि ई-लर्निंगची महागडी साधने असणारी, इस्त्रीचे कपडे घालणाऱ्या पोरांची महागडी शाळा नव्हती. पण त्या शाळेतल्या त्या वर्गातले शिक्षण श्रीमंत होते.

अशी शिक्षणातली श्रीमंती सार्वत्रिक कशी होईल? मला वाटते, भौतिक साधनसंपत्तीच्या पलीकडचा विचार यासाठी करावा लागेल. किमान साधन-सुविधा लागतील यात शंका नाही. पण या समृद्धीपेक्षा अध्ययनअनुभवांची समृद्धी शिक्षणाला अधिक गुणवत्तापूर्ण बनवेल. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्वविकसन हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्यासाठी वाचन-लेखन हे साधन आहे. तेही एकमेव साधन नव्हे. दुर्दैवाने आजच्या शिक्षणात या साधनाला (आणि आता संगणकाला) अधिकच महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष हेतुपूर्ण कृती, त्यातून घेतलेले अनुभव, त्या अनुभवांवरचा विचार आणि ते अनुभव व्यक्तिमत्त्वात मुरत जाणे दुय्यम होत चालले आहे. अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या शर्यतीत व्यक्तिमत्त्व घडणीच्या प्रक्रियेला शालेय शिक्षणात स्थानच उरले नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षणात प्रत्येक विद्यार्थ्याला 'स्व'विकासाची संधी मिळणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी शिक्षण -प्रक्रिया अधिकाधिक विद्यार्थिकेंद्रित असणे आवश्यक आहे. अशा शिक्षणव्यवस्थेत विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास होतो. या क्षमता शारीरिक, मानसिक व बौद्धिक अशा तिन्ही प्रकारच्या असतात. क्षमता विकासाच्या बरोबरीने शिक्षण -प्रक्रिया अधिक गुणवत्तापूर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रेरणाजागरणाचा आणि वृत्ती घडणीचा विचारही होणे गरजेचे आहे.

अशा त्रिवेणी शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांना एक्स्प्लोरेशनच्या संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षकांचे

आणि व्यवस्थापनाचे प्राथमिक काम आहे. इतरांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पुस्तकांतून पाठ करण्यापेक्षा स्वत:ला पडलेल्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा खटाटोप करायला लावणारी शिक्षण प्रक्रिया अधिक मौल्यवान आहे. त्यामुळे विद्यार्थ्याला शिकण्याची इच्छा निर्माण होईल असे शालेय वातावरण निर्माण करणे हे खरे आव्हान आहे. असे वातावरण निर्माण करता येते, हे या लेखाच्या प्रारंभी दिलेल्या उदाहरणावरून लक्षात येते.

मूल स्वभावत:च चौकस असते. त्याच्या चौकस बुद्धीचा विकास होण्यासाठी त्याला शिशुवयातच निरीक्षणाची संधी मिळायला हवी. परिसराशी आंतरक्रिया करत मूल परिसराचे निरीक्षण करत असते. ह्या आंतरक्रिया अर्थपूर्ण होण्यासाठी पंचेद्रियांचा विकास होणे महत्त्वाचे असते. पूर्वप्राथमिक शाळेत इंद्रिय- विकासासाठी आवश्यक असा अनुभवक्रम योजला, तर विद्यार्थ्याच्या भावी शिक्षणाचा पाया तयार होतो. त्यासाठी रंग-रूप-आकार यांचा डोळयांना अनुभव, विविध प्रकारचे आणि तीव्रतेचे आवाज ऐकणे, अनेकविध वास-चवी-स्पर्श यांचे अनुभव अशी योजना पूर्वप्राथमिक वर्गाच्या मुलांसाठी केली पाहिजे. भाषेची आणि अंकगणनाची पूर्वतयारी करून घेणाऱ्या कृतींची जोड इंद्रिय -विकासाच्या अनुभवक्रमाला दिली, तर पूर्वप्राथमिक शिक्षणाची गुणवत्ता नक्कीच वाढते. परंतु आज नर्सरीत आणि बालवाड्यांमधे चाललेले शिक्षण म्हणजे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची भ्रष्ट नक्कल आहे. ज्या वयात शालेय शिक्षणाची पूर्वतयारी होणे आवश्यक, तेथे वाचन-लेखन, गृहपाठ आणि पाठांतर असा अघोरी प्रकार चाललेला दिसतो. मुळात चौकस बुद्धी आणि जिज्ञासा असलेले मूल नंतर हळूहळू ही जिज्ञासा विसरत का जाते? हा यांत्रिक शिक्षणाचा परिणाम आहे. एकोणिसाव्या शतकातील फॅक्टरी मॉडेलवर आधारित असणाऱ्या शाळांमध्ये अध्ययन-अध्यापनशास्त्राचे कर्मकांड निर्माण झाले. शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार करण्यासाठी हे मॉडेल उपयोगी पडले असेलही, परंतु हे म्हणजे सत्त्वहीन धान्याचे अमाप उत्पादन करून स्वत:ची पाठ थोपटण्यासारखे आहे.त्यामुळे प्राथमिक शाळांमधून शिक्षण अधिकाधिक जिवंत कसे होईल, ते पाहिले पाहिजे. विद्यार्थ्यांची निरीक्षण -क्षमता आणि प्रश्न विचारण्याची वृत्ती जिथे वाढते, ते गुणवत्तापूर्ण शिक्षण!

शाळेव्यतिरिक्त मूल घरात, समाजात वावरत असते. अनेक व्यक्तींबरोबर घडणाऱ्या आंतरक्रिया, अनेक प्रसंगांमधले अनुभव गाठीला घेऊन ते शाळेत येते. शाळा या व्यवस्थेत शिक्षकांइतकेच मित्र-मैत्रिणींच्यात ते रमलेले असते. या सगळयातून त्याची जिज्ञासा सतत जागृत होत असते. ती शमवण्यासाठी अनेक प्रश्न ओठांवर आलेले असतात. असे प्रश्न विचारायला संधी मिळेल इतके शाळेतले वातावरण मोकळे असेल, तर विद्यार्थ्याचा आत्मविश्वास वाढतो. प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी छोटे-छोटे प्रयोग, कृती करण्याची संधी त्याला मिळाली, तर पाठ्यपुस्तकाच्या पलीकडे जाऊन तो विचार करायला लागतो. स्वत:ला सुचलेले इतरांना तोंडी किंवा लेखी सांगण्यासाठी तो भाषेचा उपयोग करू लागतो. इतरांचे विचार आणि भावना समजून घेण्यासाठी भाषा आली पाहिजे, हे त्याच्या लक्षात येते. भाषेचा विकास 'संवादाच्या' गरजेतून होतो. औपचारिक शिस्तीच्या 'गप्प बसा' संस्कृतीने मुलांची भाषा खुरटते. वर्गात विविध माध्यमांतून संवाद निर्माण करणारे शिक्षक शिक्षणाची गुणवत्ता वाढवत असतात. आज शिक्षणात एकाच भाषेचे महत्त्व राहिलेले नाही. सारा देश आणि जग जवळ येत असताना बहुभाषिक बनणे महत्त्वाचे आहे. त्याहून महत्त्वाचे आहे ते संवाद-संपर्क कौशल्य विकसित होणे. प्रमाण भाषेवरील प्रभुत्व उपयुक्त आहेच, परंतु मातृभाषेसह अनेक भाषांमधील बोली, प्रादेशिकता आणि त्यांची अंगभूत वैशिष्टये मुलांपर्यंत पोहोचवण्याचा कार्यक्रम भाषा शिक्षकांनी आखला पाहिजे.

शिक्षकाने शिकवणे आणि विद्यार्थ्याने शिकणे ही पारंपरिक पद्धत झाली. परंतु शिकण्यातले स्वावलंबन प्राप्त करणे महत्त्वाचे. प्राथमिक शाळेतच याचे बाळकडू मिळाले तर? शिकायचे कसे हे शिकण्याचा मार्ग ज्या व्यवस्थेत उपलब्ध होतो, ती व्यवस्था गुणवत्तापूर्ण असते. विज्ञानाच्या अथवा सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनातून अनेक प्रक्रिया हाताळण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळत असते. विविध स्रोतांतून माहिती मिळवणे, त्या माहितीवर प्रक्रिया करणे, माहितीतील सार ग्रहण करणे यासारख्या अनेक प्रक्रिया माहिती किंवा आशय शिकण्याइतक्याच महत्त्वाच्या आहेत. आजच्या वर्गाध्यापनात त्याचे प्रयोग शिक्षकांनी करावे लागतील. स्वयंअध्ययनाच्या पद्धती शिकता शिकता विद्यार्थ्याला अभ्यासाच्या सवयी लागल्या

की शिक्षणाची क्रिया योग्य दिशेने चालली आहे असे समजायला हरकत नाही.

शालेय अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची दांडी उडवणारा दहशतवादी म्हणजे गणित विषय! गणित म्हणजे अंकगणित असे पक्के समीकरण प्राथमिक शाळेत तयार होते. गणित म्हणजे विविध रचनांचा, क्रमबद्धतेचा अभ्यास हे लक्षात येण्याआधीच गणिताबद्दल नावड निर्माण होते. गणित ही समस्या परिहारासाठी मानवी मेंदूने तयार केलेली एक तर्कशुद्ध रचना आहे, याचे भान आणून देणारा शिक्षक विरळाच. गणिताशी झटापट नाही, तर मैत्री निर्माण करण्यासाठी या गणिताचे परिसराशी, निसर्गाशी आणि जीवनव्यवहाराशी नाते जोडणारी शिक्षण प्रक्रिया जेथे असते, तेथे शिकण्यातला आनंद घेता येतो. एका शाळेतला एक अनुभव येथे नमूद करण्याचा मोह आवरत नाही.

'गणितयज्ञ' - शाळेतला एक वर्ग. त्यातली पन्नास मुले. दिवसभरात सगळ्यांनी मिळून पाच हजार उदाहरणे सोडवण्याचा संकल्प सोडलेला. हा सामूहिक संकल्प पूर्ण करण्यात आमचाही वाटा असला पाहिजे असे म्हणणारी वर्गातली 'अप्रगत' मुले. त्यांना उदाहरणे सोडवण्याचा आनंद देण्यासाठी लहान इयत्तांच्या गणिताच्या पुस्तकातली त्यांच्याजोगती उदाहरणे शोधून त्यांना देणाऱ्या त्यांच्या उत्साही शिक्षिका. दिवसभर गणिताचा हा यज्ञ करताना एकाच जागी चिकाटीने बसून आनंदाने शे-दोनशे उदाहरणे सोडवण्याचा अनुभव घेणारे विद्यार्थी.. भविष्यातील कठीण समयी समस्या कशा सोडवायच्या याचा प्रात्यक्षिक अनुभवच घेत होते. अशा छोटया छोटया कल्पक कृतिकार्यक्रमांतून शिक्षणाची गुणवत्ता वाढत असते.

शैक्षणिक गुणवत्ता ही खरे तर असे शिकण्यासाठी अनुकूल वातावरण वर्गात निर्माण करण्यावर अवलंबून आहे. पण मग शिक्षणाची गुणवत्ता तपासायची कशाच्या आधारे? शालान्त परीक्षेच्या निर्णयावर ती ठरवायची असे ठरले, तर शालान्त परीक्षेची गुणात्मक फरक करण्याची पात्रताच खूप कमी झाली आहे. मग पाहिले पाहिजे ते विद्यार्थी त्यांच्या कौशल्यांचे-ज्ञानाचे उपयोजन कसे करतात ते! शालेय-सहशालेय उपक्रमांच्या नियोजनापासून ते कार्यवाहीपर्यंत विद्यार्थी त्यात कसे सहभागी होतात. सामाजिक उपक्रमांत त्यांचा सहभाग किती कल्पक, उत्साहपूर्ण आणि विधायक असतो, हा निकष शालेय शिक्षणाची गुणवत्ता अधोरेखित करणारा असतो.

व्यक्तिमत्त्व विकसन हे शिक्षणाचे उद्दिष्ट मानले, तर समाज विकसनात शिक्षणाचे उपयोजन दिसते. शिकता शिकता समाजातील विविध प्रश्नांची जाणीव होणे, वंचित घटकांबद्दल सहसंवेदना जागृत होणे आणि त्यावर काही कृती करायला मिळणे हेदेखील शालेय शिक्षणाची गुणवत्ता निश्चित करणारे घटक आहेत. क्रमिक पाठ्यपुस्तकी शिक्षणाच्या ओझ्यामुळे सामाजिक व नैतिक शिक्षण, कार्यानुभव आणि शारीरिक शिक्षण हे शिक्षणातले महत्त्वाचे विषय दबून गेले आहेत. केवळ शालेय शिक्षणाच्या आरोग्यासाठी नव्हे, तर सामाजिक आरोग्यासाठीही हे विषय अत्यंत महत्त्वाचे आहेत. या विषयांना त्यांचे उचित स्थान मिळणे गरजेचे आहे. नाहीतर मार्कांच्या चकचकाटात प्रकाशणाऱ्या शैक्षणिक गुणवत्तेला गालबोट लागल्याशिवाय राहणार नाही.

मूल पालकांचे बोट धरून शाळेत येते. त्याला शिक्षकांच्या हातांचा आधार मिळतो. पण त्याला पांगळे न करता स्वत:च्या पायावर आत्मविश्वासाने उभे राहून कोणाच्याही आधाराशिवाय मार्गक्रमण करण्याचे ज्ञान, कौशल्य आणि प्रेरणा देणारे शिक्षण हे खरे गुणवत्तापूर्ण शिक्षण.

प्रा. विवेक पोंक्षे
ज्ञान प्रबोधिनी, पुणे

( साप्ताहिक विवेक मधून साभार )

# प्रज्ञावंतांच्या जोपासनेसाठी हवे कोंदण

***ज्ञान प्रबोधिनीतर्फे सुरु करण्यात येणाऱ्या 'प्रज्ञावंतांचे शिक्षण: पद्धती आणि धोरणे' या नाविन्यपूर्ण पी.जी.डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या निमित्ताने...***

सर्व मुलांना समान शिक्षण देण्याच्या प्रयत्नात शाळांमधल्या तीक्ष्ण बुद्धीच्या मुलांचा वेगळा विचार सध्याच्या शिक्षणक्रमात, शिक्षण-पद्धतींमध्ये आणि शैक्षणिक धोरणात मागे पडला आहे. असामान्य बुद्धिमत्तेची मुले सर्वच समाजगटांमध्ये आढळून येतात. अगदी शाळांमध्ये आणि चहाच्या टपरीमध्ये सुद्धा. गावात आणि शहरात आणि अगदी आदिवासी पाड्यावर सुद्धा. अशा मुलांमध्ये असामान्य स्मरणशक्ती, अद्‌भुत कल्पकता, अफलातून विनोदबुद्धी, उत्तम तार्किक शक्ती नजरेस येते. 'काहीतरी वेगळीच चुणूक आहे' असं आपण नकळत म्हणून जातो. परंतु अशा वेगळ्या क्षमतांच्या मुलांचा विचार आपण शिक्षणव्यवस्थेत करतो आहोत का याबद्दल हा लेखनप्रपंच.

'प्रज्ञावंतांचे शिक्षण' हा विषय आपल्या भारत देशात खूपच कमी प्रमाणात अभ्यासला गेला आहे. या विषयाबद्दल अनेक गंभीर गैरसमज समाजात सर्वत्र दिसतात. सरकारी पातळीवर सुद्धा या विषयीची उदासीनता सर्वत्र दिसते. बहुतेक कोणत्याच शहरी किंवा ग्रामीण शाळांमध्ये अशा 'वेगळ्या' मुलांसाठी फारशा वेगळ्या योजना केलेल्या आढळत नाहीत. त्यातदेखील ग्रामीण आणि आदिवासी भागातल्या मुलांना शहरी भागातील मुलांच्या तुलनेत फारच कमी सोयी, सुविधा आणि शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध होतात. किंबहुना जगात मात्र अन्य अनेक देशांमध्ये 'प्रज्ञावन्तता' या विषयाचा सखोल अभ्यास केला गेला आहे. अनेक देशांमध्ये तर प्रज्ञावंत मुले-मुली ही देशाची संपत्ती म्हणून जपली जातात. त्यांच्या योग्य पोषणासाठी आणि वाढीसाठी विशेष प्रयत्न घेतले जातात. त्या त्या भागातील प्रज्ञावन्तांसाठी विशेष सरकारी आणि बिगर-सरकारी योजना राबविल्या जातात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे अमेरिका. रशियाने अंतरिक्षात सर्वप्रथम उपग्रह सोडून अमेरिकेला शह दिला तेव्हा अमेरिकेने शैक्षणिक धोरणात बदल करून त्यांच्या देशातल्या बुद्धिमान मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. नंतर कायद्यामध्ये सुधारणा करून राष्ट्रीय पातळीचा कार्यक्रम देखील राबविला.

भारतात मात्र या विषयातील फारच तुरळक प्रयोग झाले आहेत. १९८०-९० च्या दशकात ग्रामीण भागातील प्रज्ञावंत मुलांचा शोध घेतला जाऊन त्यांच्यासाठी जवाहर नवोदय विद्यालयांच्या योजनेतून स्वतंत्र वेगळ्या शाळा देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये उघडल्या गेल्या. पुण्यातील विद्यानिकेतन शाळा, दिल्ली मध्ये राजकीय प्रतिभा विकास विद्यालये, झारखंड मधील नेतरहाट आवासीय शाळा इत्यादी विशेष शाळांची स्थापना काही ठिकाणी झाली. या शाळांमधून सामान्य बुद्धिमत्तेपेक्षा जास्त क्षमतेच्या परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांसाठी विशेष शिक्षणाची सुरुवात झाली. शिष्यवृत्ती, प्रज्ञाशोध, ऑलिम्पियाड, होमी भाभा, गंधर्व महाविद्यालयाच्या संगीताच्या परीक्षा, जिल्हापरिषदेच्या क्रीडा स्पर्धा वगैरे मधून शालेय वयोगटातील प्रज्ञेला चालना मिळते आहे.

मात्र त्याच्या कितीतरी आधी म्हणजे १९६९ साली पुण्यात कै. आप्पा पेंडसेंच्या कल्पनेतून ज्ञान प्रबोधिनी शाळेची सुरुवात झाली. बुद्धिमान मुलांना त्यांच्या क्षमतेचे बौद्धिक खाद्य लागते हे जसे खरे तसेच ही बुद्धिमत्ता विधायक मार्गाला लावून तिचा उपयोग विविध सामाजिक समस्यांचा परिहार करण्यासाठी केला जाऊ शकतो हेदेखील खरे असे ज्ञान प्रबोधिनीच्या प्रयोगातून सर्वांसमोर मांडण्यात आले. प्रबोधिनीने बुद्धिमान मुलांची वेगळी शाळा काढली ती त्यासाठीच. या व्यतिरिक्त कोलकाता येथील जगदीशचंद्र बसू प्रज्ञा केंद्र आणि अन्य काही केंद्रे कार्यरत आहेत.

परंतु तरी देखील वर सांगितलेल्या शाळांची आणि केंद्रांची संख्या एकूण प्रज्ञावंत मुलांच्या संख्येच्या तुलनेत फारच कमी आहे. तसेच अशा प्रकारच्या वेगळया शाळा उघडण्यावर शासनापुढे आर्थिक आणि कायद्याच्या मर्यादादेखील आहेतच. म्हणून यासंदर्भात प्रज्ञावंत मुलांच्या वेगळया शैक्षणिक आणि भावनिक तसेच सामाजिक गरजा लक्षात घेऊन त्याप्रकारचे शिक्षण त्यांना त्यांच्या नेहमीच्या शाळेत उपलब्ध करून देणे हे जास्त आवश्यक आहे. यातून वेगवेगळया प्रकारच्या विषयांत (कला, क्रीडा, शालेय विषय इ.) असामान्य प्रतिभा असणाऱ्या मुलांचे योग्य प्रकारे संगोपन करण्याची व्यवस्था त्यांच्या शाळेतच होईल. मुलांच्या शिक्षण हक्क कायद्याच्या संकल्पनेस देखील ते सुसंगत होईल. आणि सर्वांत मुख्य म्हणजे या द्वारे भारतातल्या कानाकोपऱ्यातल्या बुद्धिमत्तेची जोपासना करता येईल. परंतु हे जितके वाटते तितके सोपे मुळीच नाही. शाळांना यासाठी क्रमिक पाठ्यक्रमाभोवती केंद्रित असलेल्या पारंपरिक शिक्षण पद्धतीमध्ये मोठा आशय जोडावा लागणार आहे. शिक्षकांना त्याप्रकारचे प्रशिक्षण द्यावे लागणार आहे.

यासाठी प्रथम बुद्धिमान मुलांच्या वेगळया प्रकारच्या गरजा कोणत्या याचा मानसशास्त्रीय अभ्यास करून त्याप्रकारचे शैक्षणिक धोरण आखणे हे महत्त्वाचे आहे. प्रज्ञावन्तता म्हणजे नेमके काय? प्रज्ञावंत कोण? वर्गात पहिला क्रमांक मिळवणारा विद्यार्थी म्हणजे प्रज्ञावंत का? या प्रश्नांची उत्तरे जाणून घेणे गरजेचे आहे.

खरं तर प्रज्ञावंत कोण किंवा प्रज्ञावन्तता कशाला म्हणायचे याची जगात 'एक' सर्वमान्य व्याख्या उपलब्ध नाही. बुद्धिमत्तेच्या मानसशास्त्रीय कसोट्या लावून त्यावरून बुद्ध्यांक काढण्याची पद्धत सर्वत्र रुजली आहे. १३० किंवा त्यावरील बुद्ध्यांक असला म्हणजे बुद्धिमान असे वर्षानुवर्षे मानले गेले आहे. किंवा, काही ठिकाणी जे विद्यार्थी आपल्या इयत्तेच्या २ किंवा जास्त वरच्या इयत्तेइतके शिकू शकतात अशांना बुद्धिमान मानले जाते. काही ठिकाणी तर अगदी लहान वयात (शालेय) प्रौढ वयाच्या तुलनेचे कौशल्य किंवा अभिव्यक्ती करणाऱ्या मुलांना बुद्धिमान मानले जाते. परंतु, थॉर्नडाइक, थर्सटन, गिलफोर्ड, गार्डनर आणि स्टर्न्बर्ग सारख्या मानसशास्त्रज्ञांनी बुद्धिमत्तेबद्दल वर मांडलेला काहीसा संकुचित विचार खोडून काढून त्याऐवजी बहुआयामी विचार मांडला. यामध्ये बौद्धिक, सर्जनशील, कलात्मक, नेतृत्वात्मक, सांगीतिक अशा अनेक अंगांचा समावेश केला गेला. तेव्हापासून जगात 'प्रज्ञावन्तता' या शब्दाची व्याप्ती वाढली आणि बुद्ध्यांकाच्या (IQ ) जुन्या कल्पनेच्या जागी बहुआयामी बुद्धिमत्तेचा विचार सर्वमान्य झाला.

व्याख्येबद्दल जरी अनेक विचार असले तरी काही बाबतीत मात्र शास्त्रज्ञ आणि शिक्षणतज्ज्ञांचे एकमत आहे. प्रज्ञावंतांच्या प्रगत बौद्धिक क्षमतांमुळे त्यांच्या इतरांपेक्षा वेगळया शैक्षणिक, मानसिक आणि भावनिक गरजा असतात. पाठान्तरावर दिलेला भर, अपुऱ्या आव्हानाचा अभ्यासक्रम, प्रज्ञावन्ततेबद्दल असणारे अज्ञान आणि गैरसमज, असंवेदनशील शिक्षक आणि शैक्षणिक रचना, मित्र आणि घरच्यांमुळे येणारा ताण, अपुरे पालकत्व आणि योग्य मार्गदर्शनाचा अभाव या सर्व गोष्टींमुळे अशी मुळात असलेली नैसर्गिक प्रज्ञा कोमेजून जाऊ शकते. प्रज्ञेच्या बहरण्यासाठी विशेष वेगळे प्रयत्न घ्यावे लागतात.

प्रज्ञावन्ततेबद्दल भारतीय समाजात अनेक गैरसमज आहेत. एक - बुद्धिमान मुले कमी प्रयत्नात यश मिळवू शकतात त्यामुळे त्यांच्या शिकण्याची फारशी काळजी करण्याची गरज नाही. अशी मुले स्वतंत्रपणे, आपापल्या बुद्धीच्या जोरावर यशस्वी होऊ शकतात. हा एक मोठा भयंकर गैरसमज आहे. खरे तर कोणत्याही प्रकारच्या प्रतिभेची अभिव्यक्ती होण्याकरिता प्रामाणिक आणि योग्य कष्ट घेण्याची गरज असतेच ना. दुसरा- सामान्य गैरसमज म्हणजे अशी मुले शाळेत कायम वरच्या क्रमांकाने उत्तीर्ण होतात. काही मुलांच्या बाबतीत हे खरे असले तरी अनेक प्रज्ञावंत मुलांमध्ये शैक्षणिक

क्षमता असूनही हे विद्यार्थी उत्तम निकाल (फक्त गुणांच्या बाबतीत नाही बर का!) देऊ शकत नाहीत. यामागे अनेक भावनिक गुंते असणं हे नैसर्गिक आहे. तिसरा- सामान्य गैरसमज म्हणजे अशी मुले ही पुस्तकी किडे असतात किंवा अतिशय आगाऊ असतात आणि इतरांशी वागण्या-बोलण्याची कौशल्ये अविकसित असतात. काहींच्या बाबतीत हे खरे असले तरी याचा संबंध थेट त्यांच्या बुद्धिमत्तेशी लावणे हे फारसे सयुक्तिक नाही. इतके मात्र खरे की अशा मुलांमध्ये वाचनाची गोडी, की अभ्यास करण्याबद्दलची अंत:प्रेरणा आणि आत्मविश्वास मोठ्या प्रमाणात दिसून येतो. परंतु या गुणवैशिष्ट्यांमुळे अशा मुलांना शाळेत अनेक वेळा चिडवले, डिवचले जाते. तर काही वेळेस पालक आणि शिक्षक अशा मुलांचे अनाठायी कोडकौतुक करून त्यातून स्वतःची फुशारकी मारून घेतात. या दोन्ही प्रकारच्या वागणुकीचा नकारात्मक परिणाम मुलांवर होतो असे संशोधनातून आढळून आले आहे.

स्वतंत्रबुद्धी, विचार करण्याची प्रगत क्षमता, कुतूहल, तीक्ष्ण ग्रहणशक्ती, तर्कशुद्ध विचार, सर्जनशीलता, उत्तम स्मरणशक्ती, तीव्र संवेदनशीलता अशा गुणवैशिष्ट्यांमुळे प्रज्ञावंत मुलांच्या शैक्षणिक गरजा वेगळया प्रकारच्या असतात हे साहजिक आहे. बरोबरीच्या गटाला या मुलांची विचार करण्याची आणि वागण्याची पद्धत विचित्र वाटू शकते. आणि आपल्याच वयाच्या गटात ही मुले विसंगत वाटू शकतात. त्यातून अनेक भावनिक गुंते तयार होतात. यासाठी अशा मुलांना लहान वयात शोधून त्यांचे योग्य प्रकारे संगोपन करणे गरजेचे ठरते. आपली मुलगी फारच प्रश्न विचारून छळ करते असे काही पालकांना वाटते. तिच्या प्रश्नांची उत्तरे देता येत नाहीत म्हणून गप्प केले जाते. याने मुळात असलेले नैसर्गिक कुतूहल मारले जाते. कल्पकतेबद्दलही हेच होऊ शकते.

आता अशी कल्पना करा की तुम्ही तुमच्या दैनंदिन कामात एकाच प्रकारचे काम करत आहात आणि ते काम करण्यात तुम्हाला कोणतेही आव्हान वाटत नाही. असे एकसुरी काम तुम्ही किती दिवस करू शकाल? तुमच्या क्षमतेपेक्षा कमी क्षमतेचे काम सततच करायला लागले तर तुम्ही ते दीर्घ काळ करू शकाल का? त्यात तुम्हाला आनंद आणि समाधान वाटेल का? त्यातून तुमच्या क्षमतांचा विकास होईल का? अजून वरच्या क्षमतेचे काम करण्यासाठी त्यातून तुमची तयारी होईल का? या सर्व प्रश्नांची उत्तरे जर नकारात्मक असतील तर प्रज्ञावंत मुलांच्या शैक्षणिक अनुभवांची कल्पना तुम्हाला करता येईल. एकाच आकाराचे कपडे जसे सर्वांना शिवून चालत नाहीत तसेच वेगवेगळया क्षमतांच्या मुलांसाठी एकाच प्रकारचे शैक्षणिक अनुभव देऊन कसे चालेल? आपल्याला मिळणाऱ्या शिक्षणातून आपल्या क्षमतांचा परिपूर्ण विकास करण्याचा आणि त्यातून प्रगती करण्याचा अधिकार प्रत्येक मुलाला नाही का?

प्रत्येक मुलाची छटा वेगळी. प्रत्येकाची आवड वेगळी. क्षमता वेगळी. एकूण चित्र कसे सुंदर होईल आणि त्यात प्रत्येक छटेला कसा न्याय मिळेल हे मात्र बघितले पाहिजे. प्रत्येकाचे वेगळेपण जपले गेले पाहिजे. चित्रकार म्हणून शिक्षकाची यात मोठी कसरत आहे. त्याला समाजातील इतरांकडून सहकार्य मिळाले पाहिजे. प्रज्ञावंतांची छटा आपल्या देशात फारशी उलगडून पाहिलेली नाही. गेली ५० वर्षे ज्ञान प्रबोधिनीमध्ये या छटेच्या मानसशास्त्राचा अभ्यास आणि त्यांच्यासाठी शैक्षणिक प्रयोग चालू आहेत. त्यातील पुढचे पाउल म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मान्यतेने 'प्रज्ञावंतांचे शिक्षण: पद्धती आणि धोरणे' ह्या पी. जी. डिप्लोमाचा श्रीगणेशा करतो आहोत. या क्षेत्रात काम करण्यासाठी कुशल मनुष्यबळ तयार व्हावे हाच यामागचा हेतू आहे.

प्रा. आकाश चौकसे

प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे


सकाळ वृत्तपत्रात हा लेख दि. ५ ऑगस्ट २०१५ रोजी प्रसिद्ध झाला.



http://www.erc-pune.org/en/resources/memories-of-dr-v-v-appa-pendse?ct=t (JPEARC_Weekly10_5_2015)



https://www.youtube.com/watch?v=0teFxLoo1tU&ct=t (JPEARC_Weekly10_12_2015)




http://www.slideshare.net/ercjpp?ct=t (JPEARC_Weekly10_19_2015)



### छोटे सायंटिस्ट उपक्रम

के पी आय टी च्या ८० अभियंत्यांसाठी दिनांक ८/१०/२०१५ रोजी विज्ञान संकल्पना इयत्ता ८ वी साठी प्रकाश व ९ वी साठी बुडणे / तरंगणे या विषयी प्रशिक्षण झाले. प्रा. उल्हास दुमणे आणि प्रकाश रणनवरे यांनी मार्गदर्शन केले. हेच प्रशिक्षण बेंगलोर आणि नवी मुंबई येथे ऑनलाइन झाले.



### प्रशिक्षण

९ व १० ऑक्टोबर रोजी डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षकांचे चित्रफिती पाठ तयार करण्याचे प्रशिक्षण झाले . यासाठी २२ शिक्षक सहभागी झाले. या प्रशिक्षणात प्रशांत दिवेकर, मृण्मयी वैशंपायन, आदिती पटवर्धन, ओंकार प्रधान यांनी मार्गदर्शन केले. चित्रफीत तयार करण्यासाठी पल्लवी पराडकर, सुहास प्रभावळे, स्मिता साठे, दिक्षा धुमाळ यांनी काम केले.



### समग्र शिक्षण उपक्रम

ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक उपक्रम संशोधिका पुणे व घाटगे पाटील उद्योग समूह, कोल्हापूर यांचा संयुक्त उपक्रम "समग्र शिक्षण" याची सुरुवात शिक्षक प्रशिक्षणाने कोल्हापूर येथे झाली. जिल्हा परिषद कोल्हापूरच्या १० प्राथमिक शाळांमध्ये प्रायोगिक तत्वावर प्रकल्पाची सुरुवात झाली. सुमार १०४ शिक्षक वमुख्याध्यापक दोन दिवसीय कार्यशाळेस उपस्थित होते.


## ज्ञान प्रबोधिनी शैक्षणिक साधन केंद्र

पत्ता : 'विनायक भवन', ५१४ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

दूरभाष : २४२०७१९३, २४२०७१९४

ई – मेल : erc@jnanaprabodhini.org

Visit us at : www.erc-pune.org